

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०२ वा | गुरुवार, दि. १९ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

ऊसदराचा आज फैसला; साडेतीन हजारांच्या पहिल्या उचलीवर शेतकरी ठाम !

तोडगा न निघाल्यास बेमुदत रेल रोको अन महामार्ग बंद; राजू शेट्टींचा आक्रमक पवित्रा

सोलापूर (कटूसत्य वृत्त) : ऊसदराच्या प्रश्नावरून सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी आणि साखर कारखानदार यांच्यातील संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. उसाला प्रतिटन ३ हजार ५०० रुपये पहिली उचल मिळावी, या मागणीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी ठाम आहेत. या मागणीवर तोडगा काढण्यासाठी १९ नोव्हेंबर रोजी होणारी बैठक एक दिवस आधीच बुधवारी रात्री आयोजित करण्यात आली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे साखर कारखानदारांच्या चेअरमनसोबत ही बैठक होणार



असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

दरम्यान, या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही, तर गुरुवारपासून सोलापूर रेल्वे स्थानकावर बेमुदत रेल रोको आणि जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग रोखण्याचा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. त्यामुळे आजच्या बैठकीत ऊसदराचा कंडका पडणार की संघर्ष आणखी पेटणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

१६ नोव्हेंबरच्या महामोर्चानंतर प्रशासनाला नमते

१६ नोव्हेंबर रोजी राजू शेट्टी आणि राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांच्या नेतृत्वाखाली हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढला होता. त्यानंतर शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. तब्बल अनेक तास चाललेल्या या आंदोलनानंतर प्रशासनाने ऊसदराचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत जिल्ह्यातील साखर कारखान्यांची ऊसतोड आणि गाळप प्रक्रिया थांबविण्याचे आदेश दिले. त्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

कारखानदारांच्या उपस्थितीत होणार निर्णायक चर्चा

प्रादेशिक सहसंचालक (साखर), सोलापूर विभागाचे किरण गायकवाड यांनी बैठकीसंदर्भात पत्र काढले आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन, सोलापूर येथे साखर कारखान्यांच्या चेअरमनची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी आणि जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे यांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. कारखानदारांनी स्वतः उपस्थित राहावे, अशी प्रशासनाची भूमिका आहे.

तोडगा निघाला नाही तर आंदोलनाची धग वाढणार

राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांना आंदोलनासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. बैठकीत प्रतिटन ३ हजार ५०० रुपयांच्या पहिल्या उचलीबाबत समाधानकारक निर्णय झाला नाही, तर गुरुवारपासून रेल्वे वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग रोखण्याची तयारी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे साखर कारखानदार नेमकी कोणती भूमिका घेतात आणि पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून काय तोडगा काढला जातो, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

कार्तिकी यात्रेसाठी ४६५६ पोलिसांचा बंदोबस्त; पंढरपुरात सुरक्षा व्यवस्था सज्ज

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी यात्रेसाठी लाखो वारकरी आणि भाविक पंढरपुरात दाखल होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाने व्यापक सुरक्षा नियोजन केले आहे. यात्रेच्या बंदोबस्तासाठी तब्बल ४ हजार ६५६ पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गर्दी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था राखणे, वाहतूक नियमन तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी विविध विशेष पथके तैनात करण्यात येणार आहेत, अशी माहिती अपर पोलिस अधीक्षक प्रेरणा कट्टे यांनी दिली.

कार्तिकी यात्रेदरम्यान शहरातील प्रमुख चौक, गदीर्ची ठिकाणे आणि महत्त्वाच्या मार्गांवर भाविकांची मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर प्रत्येक संवेदनशील आणि महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस



बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. भाविकांची गर्दी नियंत्रित करणे, वाहतुकीचा खोळंबा टाळणे आणि दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी पोलिस यंत्रणा सतर्क राहणार आहे.

यात्रेच्या काळात चोरी आणि इतर अनुचित घटनांना प्रतिबंध घालण्यासाठीही विशेष खबरदारी घेण्यात येत आहे. गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची नियमित गस्त, संशयास्पद हालचालींवर लक्ष आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. लाखो भाविकांच्या उपस्थितीत यात्रा शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी, यासाठी पोलिस प्रशासनाकडून बंदोबस्ताचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.

आषाढी वारीच्या नियोजनाप्रमाणेच कार्तिकी वारी यशस्वी करा-पालकमंत्री जयकुमार गोरे

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- आषाढी वारीच्या नियोजनाचे आणि वारकऱ्यांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचे देशभरात कौतुक झाले आहे. त्याच धर्तीवर यंदाची कार्तिकी वारीही यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित शासकीय विभागांनी जबाबदारीने व परस्पर समन्वयाने काम करावे. कार्तिकी यात्रेत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन पंढरपूर शहरात सर्वत्र स्वच्छता राखावी. वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

या बैठकीस जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

कार्तिकी यात्रेत राज्याच्या विविध भागांतून लाखो वारकरी व भाविक पंढरपुरात येतात. यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले. जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपालिकेने आपल्या हद्दीतील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत. राष्ट्रीय



महामार्ग प्राधिकरणाने अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत. दर्शन रांगेतील भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, शौचालये, मॅट आणि पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करावी. आषाढी यात्रेच्या वेळी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांप्रमाणेच कार्तिकी यात्रेतही सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही, यासाठी पोलीस प्रशासन आणि मंदिर समितीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. भाविकांना जलद व सुलभ दर्शन मिळण्यास प्राधान्य द्यावे. व्हीआयपी दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद ठेवावी. मंदिर समितीने प्रशिक्षित सुरक्षारक्षक नेमावेत. त्यांच्या चारित्र्याची पडताळणी करून अहवाल सादर करावा. मंदिर समितीचे कर्मचारी व सुरक्षारक्षकांनी भाविकांशी सौजन्याने वागावे. शासकीय महापूजेचे नियोजन पोलीस प्रशासनाच्या सूचनांनुसार करावे, असेही त्यांनी सांगितले.

भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाण्याची नियमित तपासणी करावी. महावितरणने यात्राकाळात अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा करावा. नदीपात्रात होडीतून प्रवास करणाऱ्या भाविकांसाठी पुरेशा प्रमाणात लाईफ जॅकेट उपलब्ध करून द्यावेत.

पंढरपूर शहर व परिसरात मांस-मटण आणि मद्यविक्री पूर्णपणे बंद ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या.

वाखरी येथे जनावरांचा मोठ्या प्रमाणात बाजार भरत असल्याने त्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. बाजार संपल्यानंतर पालखीतळाची स्वच्छता करावी. यात्राकाळात सोपविण्यात आलेली कामे सर्व विभागांनी जबाबदारीने आणि परस्पर समन्वयाने पूर्ण करावीत. यंदाची कार्तिकी यात्रा सुरक्षित, सुरळीत व सुखकर पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनबद्ध काम करावे.

प्रादेशिक परिवहन विभागाने वारकऱ्यांच्या वाहनांना विनाकारण अडचणी निर्माण करू नयेत, असेही पालकमंत्री गोरे यांनी निर्देशित केले.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी प्रशासनाने कार्तिकी वारीच्या अनुषंगाने केलेल्या तयारीची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सादर केली. तर मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मंदिर समितीमार्फत भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा व शासकीय महापूजेच्या नियोजनाबाबतची माहिती दिली तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी कार्तिकी वारीच्या नियोजनाची माहिती बैठकीत दिली.

१५ वर्षांपासून राजूबाई मॅटर्निटी होमचे काम रखडले

महापालिकेचे पाच कोटींचे नुकसान झाल्याचा आरोप!

गोरगरीब महिलांचे हक्काचे रुग्णालय बिल्डरच्या घशात

मंत्री चंडक कन्स्ट्रक्शन व जबाबदार अधिकाऱ्यांच्या चौकशीची सीए सुशील बंदपट्टे यांची मागणी



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरातील बुधवार पेठ परिसरात गोरगरीब महिलांसाठी वरदान ठरलेले राजूबाई मॅटर्निटी होम आणि राजूबाई ओपीडी आज विकासाच्या नावाखाली रखडलेल्या बीओटी प्रकल्पाच्या विळख्यात अडकले आहे. रुग्णालय आणि व्यापारी संकुल उभारण्याच्या नावाखाली महापालिकेची मौल्यवान जागा खासगी विकासकाच्या ताब्यात गेली; मात्र तब्बल १५ वर्षांनंतरही प्रकल्प पूर्ण झाला नाही. परिणामी महापालिकेचे कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा गंभीर आरोप सीए सुशील बंदपट्टे यांनी केला आहे. संबंधित बिल्डर, तत्कालीन अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

१८ महिन्यांत रुग्णालय, २४ महिन्यांत संपूर्ण प्रकल्प; प्रत्यक्षात वर्षानुवर्षे प्रतीक्षाच!

६ एप्रिल २०१० रोजी कामाची वर्क ऑर्डर देण्यात आली, तर १५ सप्टेंबर २०११ रोजी नोंदणीकृत करारनामा करण्यात आला. करारानुसार १८ महिन्यांत रुग्णालय आणि २४ महिन्यांत म्हणजे ऑक्टोबर २०१३ पर्यंत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करून महापालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक होते. मात्र, करारातील मुदत संपून अनेक वर्षे उलटली तरी प्रकल्प पूर्ण झालेला नाही. गोरगरीब महिलांसाठी उभारण्यात येणारे रुग्णालय आजही पूर्ण क्षमतेने सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहे.

थकीत प्रीमियम, दंड, भाडे आणि मालमत्ता कराचा डोंगर!

बंदपट्टे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पातून महापालिकेला मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नालाही मोठा फटका बसला आहे.

- **प्रीमियमची थकबाकी :** करारानुसार ५५ लाख रुपयांपैकी २८.५० लाख रुपये भरले असून २६.५० लाख रुपये अद्याप थकीत आहेत.
- **विलंबाचा दंड :** ऑक्टोबर २०१३ पासून दंड आकारणी सुरू झाली. नोव्हेंबर २०२० पर्यंत दंडाची रक्कम ६३ लाख ८७ हजार ५०० रुपये झाली होती. २०२६ पर्यंत ही रक्कम दीड कोटींच्या आसपास पोहोचल्याचा दावा करण्यात आला आहे.
- **गाळ्यांचे बुडालेले भाडे :** नोव्हेंबर २०२० पर्यंत ७७ लाख ५८ हजार १८० रुपयांचे भाडे महापालिकेला मिळाले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.
- **मालमत्ता कराचे नुकसान :** ३८ लाख ५७ हजार ८२६ रुपयांचा मालमत्ता कर बुडाल्याचा आरोप आहे.

या सर्व बाबींची बेरीज करता केवळ नोव्हेंबर २०२० पर्यंतच व्याज वगळता दोन कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान झाल्याचे बंदपट्टे यांनी म्हटले आहे. व्याज आणि पुढील कालावधीतील थकबाकी धरून २०२६ मध्ये हे नुकसान पाच कोटी रुपयांच्या पुढे गेल्याचा त्यांचा दावा आहे.

१,९२४ चौरस मीटर जागेचा बीओटी करार!

बुधवार पेठ येथील सिटी सर्व्हे क्रमांक ८७४६/१अ (नवीन १०६६७) मधील १,३२९ चौरस मीटर आणि टी.पी. स्कीम क्रमांक २ मधील अंतिम भूखंड क्रमांक ३०/९ किंवा ३०/६ येथील ५९५ चौरस मीटर, अशा एकूण १,९२४ चौरस मीटर मोक्याच्या जागेवर रुग्णालय आणि व्यापारी संकुल उभारण्याचा बीओटी तत्त्वावर निर्णय घेण्यात आला होता.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने २५ ऑगस्ट २००६ रोजी ठराव क्रमांक १२३ आणि २१ नोव्हेंबर २००८ रोजी ठराव क्रमांक २०२ अन्वये या प्रकल्पाला मान्यता दिली. त्यानंतर २६ फेब्रुवारी २०१० रोजी स्थायी समितीच्या ठराव क्रमांक २७९२ नुसार मे. मंत्री चंडक कन्स्ट्रक्शन लिमिटेड यांची निविदा मंजूर करण्यात आली.

राजूबाई रुग्णालयाचा ताबा घ्या, गोरगरीब महिलांसाठी पुन्हा सुरू करा!

या प्रकरणात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८१-ब (१) अन्वये महापालिकेने बजावलेल्या नोटिसीची तातडीने अंमलबजावणी करून जागा आणि अर्धवट इमारत ताब्यात घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विकासकाकडून आणि कायदेशीरदृष्ट्या जबाबदार व्यक्तींकडून थकीत प्रीमियम, दंड, बुडालेले भाडे आणि मालमत्ता कर व्याजासह वसूल करावा, अशीही मागणी आहे. याशिवाय मुख्य लेखापरीक्षकांनी नोंदविलेल्या आठही आक्षेपांचा खुलासा सार्वजनिक करावा आणि महापालिकेने स्वतःच्या निधीतून राजूबाई मॅटर्निटी हॉस्पिटलचे काम पूर्ण करून ते गोरगरीब महिलांसाठी तातडीने खुले करावे, अशी मागणी सीए सुशील बंदपट्टे यांनी केली आहे.

मुख्य लेखापरीक्षकांचे आठ आक्षेप गुलदस्त्यात का?

महापालिकेचे मुख्य लेखापरीक्षक यांनी २४ नोव्हेंबर २०२१ रोजी या प्रकल्पासंदर्भात आठ गंभीर लेखापरीक्षण आक्षेप नोंदविल्याचे बंदपट्टे यांनी म्हटले आहे. हे आक्षेप नेमके कोणते, त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई का झाली नाही, याचा खुलासा जनतेसमोर करण्याची मागणी करण्यात आली आहे.

बिल्डरसोबत अधिकाऱ्यांचीही चौकशी करा!

माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या कागदपत्रांच्या आधारे या प्रकल्पाच्या मंजुरीपासून ते अंमलबजावणीतील दिरंगाईपर्यंत अनेकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. मे. मंत्री चंडक कन्स्ट्रक्शन लिमिटेड (सध्याचे नाव सुनील मंत्री रिअॅलिटी लिमिटेड), कंपनीचे अधिकृत स्वाक्षरीकर्ता किशोर श्रीवल्लभ चंडक आणि मुखत्यारधारक कल्पेश अरविंद झवेरी यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. २०११ मध्ये करारपत्रावर स्वाक्षरी करणारे तत्कालीन नगर आयुक्त अजित मारुतीराव जावळे आणि अधीक्षक भूमी व मालमत्ता सच्चिदानंद अर्जुनराव व्हटकर यांच्यासह संबंधित नगर अभियंता, सहाय्यक अभियंता आणि भूमी व मालमत्ता विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

२०१९ मध्ये भूमी व मालमत्ता विभाग आणि नगर अभियंता कार्यालयाने एकमेकांवर जबाबदारी ढकलल्याचे पत्रव्यवहारातून दिसून येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच कंपनी दिवाळखोरी प्रक्रियेत असतानाही ५ ऑक्टोबर २०२१ रोजी झालेल्या बैठकीत उच्च न्यायालयातील जागेचा ताबा मिळविण्यासाठी दाखल केलेला अर्ज मागे घेण्याबाबत निर्णय घेण्यात आल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. या निर्णयामागील प्रशासकीय भूमिका तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेची जागा, जनतेचा पैसा आणि महिलांच्या आरोग्याचा प्रश्न!

राजूबाई मॅटर्निटी होमचा प्रश्न हा केवळ एका रखडलेल्या बांधकामाचा नाही. तो महापालिकेच्या मालमत्तेच्या संरक्षणाचा, सार्वजनिक निधीच्या जबाबदारीचा आणि गोरगरीब महिलांच्या आरोग्यसेवेच्या हक्काचा आहे. बीओटीच्या नावाखाली दिलेल्या जागेचा अपेक्षित विकास झाला नसेल, तर त्याची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. अखेर या प्रकल्पात चूक नेमकी कोणाची आणि त्याची किंमत सोलापूरकरांनी किती काळ मोजायची, याचे उत्तर महापालिका प्रशासनाने देण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्राच्या धरणांमधील पाणीसाठा ६४ टक्क्यांवर!

मुंबई (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्रातील कमी पावसाचा परिणाम आता धरणांमधील साठलेल्या पाण्यावर जाणवत आहे. राज्याच्या जलसंपदा विभागाने मंत्रिमंडळाला सादर केलेल्या आकडेवारीनुसार, १७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत राज्यातील धरणांमधील प्रत्यक्ष पाणीसाठा ९२३.६० टीएमसीपर्यंत घटला आहे.

हे धरणांच्या एकूण साठवण क्षमतेच्या ६४ टक्के आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीत धरणांमध्ये १,३०९.९३ टीएमसी (९० टक्के) पाणी उपलब्ध होते. हे एकाच वर्षात पाणीसाठ्यात ३८६.३३ टीएमसीची घट दर्शवते. या घटीमुळे आगामी रब्बी हंगाम आणि उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची आणि सिंचनाची



उपलब्धता याबद्दल चिंता वाढली आहे. ही परिस्थिती गंभीर आहे, कारण अपुऱ्या पावसामुळे राज्य सरकारने ३०४ तालुक्यांमध्ये आधीच दुष्काळ जाहीर केला आहे. सरकार बाधित भागांमध्ये मदत आणि बचाव उपाययोजना राबवत आहे. तथापि, धरणांमधील घटत्या पाणीपातळीमुळे येत्या काही महिन्यांत जल व्यवस्थापनाचे आव्हान वाढण्याची शक्यता आहे.

विभागीय आकडेवारी पाहता, मराठवाड्याचा समावेश असलेल्या छत्रपती संभाजीनगर विभागात पाणीसाठ्याची परिस्थिती सर्वात चिंताजनक आहे. गेल्या वर्षी याच वेळी येथे पाण्याची उपलब्धता ९० टक्के होती, पण आता ती केवळ ३६ टक्क्यांपर्यंत घसरली आहे. अमरावती विभागात ५२ टक्के, तर नागपूर विभागात ५६ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला आहे. त्या तुलनेत, कोकण विभागात ८१ टक्के, पुण्यात ७५ टक्के आणि नाशिकमध्ये ७४ टक्के पाणीसाठा आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या तुलनेत राज्यातील सर्व सहा विभागांमध्ये पाणीसाठ्यात घट झाली आहे.

मुंबई आणि ठाणे महानगरपालिकांच्या पाणीपुरवठा प्रणालीशी जोडलेल्या जलाशयांमध्येही गेल्या वर्षीच्या तुलनेत पाणी कमी आहे. त्यांचा एकत्रित पाणीपुरवठा गेल्या वर्षीच्या ९५ टक्क्यांच्या तुलनेत ८४ टक्के असल्याचे सांगण्यात आले आहे. मोडक सागर धरणातील पाणीसाठा गेल्या वर्षीच्या तुलनेत ३५ टक्क्यांनी घटून ४६ टक्क्यांवर आला आहे. दरम्यान, अप्पर वैतरणा धरणात ९४ टक्के पाणी उपलब्ध आहे.



संपादकीय

महागाईचे चटके

दिवाळीचा सण आनंद आणि उजेड घेऊन येतो. मात्र, यंदाचा हा काळ सर्वसामान्य नागरिकांसाठी आर्थिक विवंचनेचा आणि चिंतेचा ठरत आहे. दिवाळीत, विशेषत: लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फटाक्यांच्या प्रदूषणामुळे आकाश काळवंडले होते. तद्वतच सध्या किरकोळ महागाईचा निर्देशांक आगामी काळातील आर्थिक स्थितीचे काळवंडलेले चित्र दाखवतो आहे.

नुकत्याच समोर आलेल्या आकडेवारीनुसार, ऑक्टोबर महिन्यात किरकोळ महागाईचा दर उसळून ६.०९ टक्क्यांवर पोहोचला आहे. हा दर रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेली चार टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडून गेला आहे. महागाईचा हा भडका आता सामान्यांच्या जगण्याला चटके देणार, ही व्यक्त होत असलेली भीती रास्तच. कारण, केवळ अन्नधान्यच नव्हे, तर भाजीपाला, तेल, डाळी, इंधन आणि घरापासून ते दैनंदिन उपयोगातील सर्वच गोष्टी महागल्या आहेत. याचा सर्वाधिक आणि थेट फटका बसणार तो मध्यमवर्गीय आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांना. घर चालवणे, मुलांचे शिक्षण, आरोग्याचा खर्च आणि भविष्यासाठी बचत करणे या त्यांच्या सर्व गोष्टींवर आर्थिक ताण आला आहे. सणासुदीच्या काळातही हक्काचा गोडधोड घास खाताना विचार करण्याची वेळ सर्वसामान्यांवर येत असेल, तर ही परिस्थिती वेदनादायी आणि राज्यकर्त्यांनी गांभीर्याने विचार करावी अशीच.

या वाढत्या महागाईची रिझर्व्ह बँकेला आता अत्यंत गांभीर्याने दखल घ्यावीच लागेल. रिझर्व्ह बँकेने महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी ४ टक्के (अधिक-वजा २ टक्के) अशी लक्ष्यांक मर्यादा निश्चित केली आहे. मात्र, सध्याचा ६.०९ टक्क्यांचा दर या लक्ष्यांकापेक्षा खूपच अधिकचा आहे. महागाईचा दर असाच वाढता राहिल्यास आर्थिक स्थैर्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. आगामी काळात दुष्काळी परिस्थिती आणि अपुरा पाऊस यामुळे शेती उत्पादनावर विपरीत परिणामांची दाट शक्यता आहे. पिकांच्या नुकसानीमुळे अन्नधान्याचा तुटवडा भासू शकतो आणि हे संकट भविष्यात आणखी गंभीर रूप धारण करू शकते. ही संभाव्य टांगती तलवार ओळखून आत्ताच तातडीने कठोर पावले उचलणे गरजेचे ठरते.

या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँकेने तातडीने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. रिझर्व्ह बँकेला व्याजदरांच्या धोरणाबाबत अधिक कडक भूमिका घ्यावी लागेल; जेणेकरून बाजारातील रोकड तरलता नियंत्रणात येऊन मागणीला लगाम बसेल. दुसरीकडे, सरकारने पुरवठा साखळीतील त्रुटी दूर करून साठेबाजांवर कठोर कारवाई केली पाहिजे. जीवनावश्यक वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी बाजारात वेळीच हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, सिंचनाची शाश्वत सोय आणि पीकविम्याचे सुरक्षा कवच देऊन धीर देणे गरजेचे आहे. असे झाल्यास अन्नधान्याचे उत्पादन धोक्यात येणार नाही.

या सर्व धोरणात्मक उपायांसोबतच, सध्याच्या काळात सर्वसामान्य माणसाने या परिस्थितीला कसे तोंड दिले पाहिजे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या स्थितीत टिकून राहण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला आता अधिक सावध आणि काटकसरीचे आर्थिक धोरण आखावे लागेल. घरगुती पातळीवर बजेट कोलमडू नये म्हणून बचतीची जुनी सवय पुन्हा अंगीकारावी लागेल. त्याखेरीज दुसरा पर्याय दिसत नाही. या संकटावर मात करण्यासाठी संयम आणि आर्थिक शिस्त हीच सामान्यांची खरी ढाल ठरू शकते. महागाई हा केवळ आर्थिक आकड्यांचा खेळ नाही, तर तो माणसाच्या जगण्याच्या अधिकाराशी जोडलेला प्रश्न आहे. जेव्हा महागाईची सीमा ओलांडली जाते, तेव्हा समाजातील शांतता आणि प्रगती धोक्यात येते.

अर्थचक्राची स्वत:ची अशी एक गती असते. ती आपल्या दैनंदिन जगण्याशी जोडलेली असते. त्या चक्राला खीळ बसल्यास सर्वच समाजघटकांवर विपरीत परिणाम होतो. हे टाळण्यासाठी आता गरज आहे ती एकात्मिक प्रयत्नांची. सरकार, प्रशासकीय यंत्रणा आणि सामान्य नागरिक या तिघांनीही आपापल्या परीने या संकटाचा मुकाबला केला, तरच आपण या आर्थिक चक्रव्यूहातून बाहेर पडू शकू; अन्यथा, महागाईचा हा वणवा संपूर्ण अर्थव्यवस्थेला घेरल्याशिवाय राहणार नाही. वेळ अद्याप हाताबाहेर गेलेली नाही, मात्र आत्ताच पावले न उचलल्यास उद्या कदाचित उशीर झालेला असेल!

चौथ्यांदा आयर्नमॅन ठरले सोलापूरचे एकमेव डॉ. अभिजित वाघचवरे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ. अभिजित वाघचवरे यांनी व्हिएतनाम देशातील फु कॉक या बेटावरील आयर्नमॅनची स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. स्विमिंग, सायकलींग आणि रनिंग अशा तीन स्तरावरील ही स्पर्धा त्यांनी पूर्ण करून चौथ्यांदा आयर्नमॅनचा खिताब मिळवणारे सोलापूरमधील पहिलेच स्पर्धक ठरले. पहिल्यांदा सन 2019 मध्ये गोवा, दुसऱ्यांदा सन 2024 मध्ये इटलीमध्ये फूल्ल आयर्नमॅन आणि तिसऱ्यांदा सन 2026 च्या सुरूवातीला ओमान मध्ये आयर्नमॅनची स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली त्यानंतर सन 2026 च्या नोव्हेंबर मध्ये व्हिएतनामध्ये त्यांनी चौथ्यांदा आयर्नमॅन ही स्पर्धा पूर्ण केली. यामध्ये जगभरातील 800 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. रविवारी पहाटे थंड वातावरणात दक्षिण चीनच्या समुद्रात 2 किमी.



स्विमिंग करून लगेच समुद्राच्या किनारी असलेल्या रोलिंग रोडवरील 90 किलोमिटर सायकलींग 3 तास 10मिनिटात पूर्ण केले त्यानंतर 21 किलोमिटर रनिंग ऊन वाऱ्यांचा सामना करत सात तास अठरा मिनिटात पूर्ण करत भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत ही स्पर्धा पूर्ण करून चौथ्यांदा आयर्नमॅनचे मेडल पटकावले.डॉ. अभिजित वाघवरे यांनी अनेक मॅराथॉन मध्ये सहभाग घेत अनेकांना प्रोत्साहीत केले आहे. शरीत तंदुरूस्त आणि मन प्रसन्न ठेवून ही कठोर स्पर्धा पूर्ण करण्यासाठी परिवाराकडून चांगली मदत मिळते

पत्नी डॉ.राजश्री ही स्वत: मॅरेथॉन रनर आणि सायकलीस्ट आहे तसेच बंधू दंतरोग तज्ञ डॉ. सत्यजित वाघचवरे हेही मॅरेथॉन रनर आणि सायकलीस्ट आहेत. नियमित व्यायामातून हे साध्य करता येते यासाठी आपला व्यवसाय सांभाळून वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व सहकारी, मित्र तसेच वाघचवरे परिवाराकडून नेहमी प्रेरणा आणि मदत मिळते असे डॉ. अभिजित वाघचवरे यांनी सांगितले.

वात्रटिका

किर्तन व निरूपण

त्यांच्या किर्तनात पुन्हा
एकदा तेच चरण आले...
नावाचा मोठा गाजावाजा तरी
खंडीभर वरण गहाण केले...
बोलले की तमाशा झाला
असे कसे हे यांचे किर्तन...
मुलीच्या बापाने मुलीला
कमी लेखावे हे कसे वर्तन...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

राष्ट्रीय एकात्मता : राष्ट्राच्या सामर्थ्याचा आणि प्रगतीचा आधार

भारत हा विविधतेने नटलेला आणि सांस्कृतिक समृद्धीचा वारसा लाभलेला देश आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या एका भागातील भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि परंपरा दुसऱ्या भागापेक्षा वेगळ्या असल्या, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्वाची भावना होय. ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात देशाविषयी आपलेपणा, परस्परांविषयी आदर, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक जबाबदारी निर्माण करते. विविधतेचा स्वीकार करून एकतेची भावना जपणे, प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ राजकीय किंवा भौगोलिक संकल्पना नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर विकसित होणारी व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना विविधतेतील एकतेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशातील सर्व नागरिकांनी आपापली स्वतंत्र ओळख विसरून एकसारखे जीवन जगणे नव्हे. प्रत्येकाला आपली भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा जपण्याचे स्वातंत्र्य असतानाच इतरांच्या वेगळेपणाचा आदर करण्याची मानसिकता विकसित होणे म्हणजे खरी राष्ट्रीय एकात्मता होय. विविधतेचे अस्तित्व मान्य करून त्यातून परस्पर विश्वास, सहकार्य, बंधुभाव आणि समान राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या कोणत्याही भागातील नागरिकाला इतर प्रदेशातील नागरिक परका वाटू नये, तर सर्वजण एका व्यापक राष्ट्रीय कुटुंबाचे घटक आहेत, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. ही भावना केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी व्यक्त होऊन चालणार नाही, तर दैनंदिन सामाजिक व्यवहारातही तिचे प्रतिबिंब दिसले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये राष्ट्रीय एकात्मतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील विविध जाती, धर्म, भाषा आणि प्रदेशांतील नागरिक एकत्र आले होते. त्यांची सामाजिक पार्श्वभूमी आणि जीवनपद्धती वेगवेगळी असली, तरी परकीय सत्तेपासून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचे ध्येय समान होते. स्वातंत्र्यलढ्याने भारतीय समाजाला त्याग, सहकार्य, सामूहिक संघर्ष आणि देशप्रेमाची शिकवण दिली. या संघर्षामध्ये विविध समाजघटकांनी दिलेले योगदान भारतीय राष्ट्रीयत्वाच्या जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर राष्ट्रीय अखंडता टिकविणे, लोकशाही व्यवस्था मजबूत करणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि सर्वसमावेशक विकास साधणे ही आव्हाने होती. या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अत्यावश्यक ठरली.

भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वांत महत्त्वाचा आधार आहे. संविधानाच्या उद्देशिकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. ही मूल्ये भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांबरोबरच राष्ट्रीय एकात्मतेची दिशादर्शक तत्त्वे आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळते. विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करते. कायद्यापुढील समानता नागरिकांमधील भेदभावाला प्रतिबंध करते, तर बंधुतेची भावना व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडता टिकविण्यास मदत करते. त्यामुळे संविधानाचे पालन करणे, संविधानिक संस्थांचा आदर करणे आणि लोकशाही मूल्यांचे आचरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संविधानातील मूल्ये केवळ शासकीय व्यवस्था किंवा न्यायालयीन प्रक्रियेपुरती मर्यादित न राहता ती समाजाच्या सामूहिक जीवनात रुजली पाहिजेत. राष्ट्रीय एकात्मतेच्या जडणघडणीत सामाजिक समतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय समाजामध्ये जातीय भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक उच्चनीचता आणि आर्थिक विषमता यांसारख्या समस्या ऐतिहासिकदृष्ट्या अस्तित्वात राहिल्या आहेत. या विषमतेमुळे समाजातील अनेक घटकांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या संधींपासून वंचित राहावे लागले. अशा परिस्थितीत केवळ एकतेच्या घोषणा देऊन सामाजिक एकात्मता साध्य होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान, समान संधी आणि न्याय्य वागणूक मिळणे आवश्यक आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक परिस्थिती यांच्या आधारावर कोणताही भेदभाव होता कामा नये. सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी, वंचित घटकांचे सक्षमीकरण आणि दुर्बल समूहांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेणे यांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा पाया मजबूत होतो. समाजातील प्रत्येक घटकाला प्रतिष्ठेने जगण्याची संधी मिळणे ही सशक्त राष्ट्रनिर्मितीची पूर्वअट आहे.

धार्मिक विविधता ही भारतीय समाजाची महत्त्वपूर्ण ओळख आहे. भारतामध्ये विविध धर्मांचे, पंथांचे आणि श्रद्धापरंपरांचे नागरिक एकत्रितपणे राहतात. प्रत्येक धर्माची स्वतंत्र उपासना पद्धती, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक परंपरा आणि जीवनविषयक दृष्टिकोन आहे. या विविधतेमुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध झाली आहे. मात्र, धर्माच्या नावावर द्वेष, असहिष्णुता, पूर्वग्रह आणि संघर्ष निर्माण होणे हे राष्ट्रीय एकात्मतेसमोरील गंभीर आव्हान आहे. कोणत्याही धर्माचा अवमान न करता प्रत्येकाच्या श्रद्धेचा आदर करणे ही सुसंस्कृत समाजाची मूलभूत अपेक्षा आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग असली, तरी सार्वजनिक जीवनामध्ये मानवी मूल्ये, परस्पर सन्मान आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. विविध धर्मांच्या नागरिकांमध्ये संवाद वाढविणे, सामूहिक सामाजिक उपक्रम राबविणे आणि एकमेकांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे यांमुळे परस्पर विश्वास दृढ होतो. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव यांमुळे राष्ट्रीय एकात्मतेला स्थैर्य प्राप्त होते.

भाषिक विविधता ही भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. देशातील विविध राज्यांमध्ये अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात. प्रत्येक भाषेमध्ये त्या प्रदेशाचा इतिहास, लोकजीवन, साहित्य, ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक अनुभव सामावलेले आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, गुजराती, पंजाबी, आसामी आणि इतर अनेक भाषांनी भारतीय साहित्य व संस्कृती समृद्ध केली आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून प्रत्येक भाषेला तिचे स्वतंत्र महत्त्व आहे. मातृभाषेचा अभिमान बाळगणे स्वाभाविक असले, तरी इतर भाषांचा अवमान करणे योग्य नाही. भाषेच्या आधारावर प्रादेशिक श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होऊ नये. विविध भारतीय भाषांमधील साहित्याचे अनुवाद, भाषिक शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आंतरराज्यीय संवाद यांमुळे परस्पर समज वाढते. भाषा ही माणसांना जोडणारी शक्ती ठरली पाहिजे, विभागणी करणारे साधन नव्हे. राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी प्रादेशिक समतोल आणि सर्वसमावेशक विकासालाही विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्ये आणि प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक विकास, शेती, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या बाबतीत वेगवेगळ्या स्थितीत आहेत. काही प्रदेशांमध्ये वेगाने विकास होत असताना काही भागांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ आणि सीमावर्ती भागांतील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, वाहतूक, पिण्याचे पाणी आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नाहीत. विकासातील ही विषमता दूर करण्यासाठी सर्व प्रदेशांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. स्थानिक गरजांनुसार विकासाचे नियोजन, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्यसेवांचा विस्तार यांमधून प्रादेशिक असमतोल कमी करता येतो. एखाद्या प्रदेशाचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.

शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांची रुजवण होते. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ ज्ञानप्राप्तीची केंद्रे नसून सामाजिक समरसता आणि जबाबदार नागरिकत्व घडविण्याची महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. विविध जाती, धर्म, भाषा आणि आर्थिक स्तरांतील विद्यार्थी एकत्र शिकतात, खेळतात आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या प्रक्रियेत त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्य, मैत्री आणि समानतेची भावना विकसित होते. अभ्यासक्रमामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढा, संविधानिक मूल्ये, सामाजिक सुधारणा, विविध भारतीय संस्कृती, लोकशाही आणि मानवी हक्क यांचा समावेश असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख ज्ञान न देता जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून दिली पाहिजे. राष्ट्रीय सण, संविधान दिन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आंतरराज्यीय विद्यार्थी देवाणघेवाण यांच्या माध्यमातून एकात्मतेची भावना अधिक दृढ करता येते.

आजच्या काळात युवकांची भूमिका राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. भारत हा तरुण लोकसंख्येचा देश असल्यामुळे देशाच्या वर्तमान आणि भविष्याची दिशा ठरविण्यात युवकांचा मोठा वाटा आहे. युवकांमध्ये ऊर्जा, कल्पकता, तंत्रज्ञानाची जाण आणि परिवर्तनाची क्षमता आहे. या क्षमतेचा उपयोग समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी आणि विकासात्मक उपक्रमांना गती देण्यासाठी झाला पाहिजे. युवकांनी जातीय आणि धार्मिक पूर्वग्रहांपासून दूर राहून विवेकपूर्ण विचार स्वीकारणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील अपप्रचार, द्वेषपूर्ण संदेश आणि अफवांना बळी न पडता माहितीची सत्यता तपासण्याची सवय त्यांनी विकसित केली पाहिजे. रक्तदान, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, ग्रामविकास आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये युवकांचा सहभाग वाढल्यास समाजातील एकोपा अधिक दृढ होऊ शकतो. युवकांनी आपल्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच समाजाच्या सामूहिक प्रगतीचाही विचार केला पाहिजे.

महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण हेदेखील राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्वाचे परिमाण आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासात महिलांचे योगदान मोठे आहे. तथापि, आजही अनेक महिलांना लिंगभेद, हिंसाचार, असुरक्षितता, आर्थिक परावलंबित्व आणि सामाजिक बंधनांचा सामना करावा लागतो. महिलांना समान शिक्षण, रोजगार, निर्णयप्रक्रियेतील सहभाग आणि सुरक्षित सामाजिक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि आदिवासी महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे, महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे, नेतृत्वक्षमता विकसित करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांचा सहभाग वाढविणे या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. समाजातील निम्म्या लोकसंख्येला समान प्रतिष्ठा आणि संधी नाकारून राष्ट्रीय एकात्मतेची कल्पना पूर्ण होऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणामुळे कुटुंब, समाज आणि राष्ट्र या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

ग्रामीण आणि आदिवासी समाजाचा राष्ट्रीय एकात्मतेतील सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. भारताच्या ग्रामीण जीवनामध्ये शेती, पशुपालन, ग्रामोद्योग, लोककला आणि पारंपरिक ज्ञानव्यवस्थांचा मोठा वाटा आहे. आदिवासी समाजाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषा, नृत्य, संगीत, लोकपरंपरा, निसर्गाशी असलेले नाते आणि सामुदायिक जीवनपद्धती यांद्वारे भारतीय संस्कृतीला समृद्ध केले आहे. मात्र, विकासाच्या प्रक्रियेत या समाजांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यांच्या जमिनी, जंगल, जलस्रोत, पारंपरिक उपजीविका आणि सांस्कृतिक अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला केवळ विकास योजनांचा लाभार्थी न मानता विकास प्रक्रियेतील सक्रिय भागीदार म्हणून स्थान दिले पाहिजे. त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग आणि शिक्षण व रोजगाराच्या संधींचा विस्तार यांमधून राष्ट्रीय एकात्मता अधिक व्यापक आणि समावेशक बनू शकते.

राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आधुनिक आव्हानांमध्ये जातीयवाद, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, प्रादेशिक अस्मिता, आर्थिक विषमता आणि राजकीय ध्रुवीकरण यांचा समावेश होतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा आणि राजकीय विचारधारा स्वीकारण्याचा अधिकार आहे. मात्र, मतभिन्नतेचे रूपांतर वैयक्तिक द्वेषात किंवा सामाजिक संघर्षात होता कामा नये. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक जीवनातील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींनी समाजामध्ये बंधुभाव आणि संवादाचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. निवडणुकीच्या राजकारणात जात, धर्म आणि भाषेच्या आधारावर समाजाचे विभाजन करण्याचे प्रयत्न लोकशाहीच्या मूलभूत भावनेला बाधा पोहोचवतात. राजकीय मतभेद असले तरी राष्ट्रीय हित, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मतभिन्नता ही लोकशाहीची ताकद आहे; परंतु परस्परांचा द्वेष करणे ही तिची कमजोरी आहे, याचे भान समाजाने ठेवले पाहिजे.

समाजमाध्यमे आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेला नवीन परिमाण प्राप्त झाले आहे. आज माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होतो. देशातील एका भागात घडलेली घटना काही क्षणांत संपूर्ण देशापर्यंत पोहोचते. यामुळे विविध प्रदेशांतील लोकांना एकमेकांच्या समस्या, संस्कृती आणि सामाजिक परिस्थिती समजून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मात्र, याच माध्यमांचा गैरवापर करून खोट्या बातम्या, अफवा, धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश आणि द्वेषपूर्ण मजकूर पसरविला जातो. अशा माहितीमुळे समाजात गैरसमज, अविश्वास आणि संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि माध्यम साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोतांचा आधार घेणे आणि जबाबदारीने अभिव्यक्ती करणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांचा उपयोग विविध संस्कृतींची ओळख करून देण्यासाठी, राष्ट्रीय प्रश्नांवर विधायक चर्चा घडविण्यासाठी आणि सामाजिक सहकार्य वाढविण्यासाठी केला पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी आर्थिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासदेखील तितकाच आवश्यक आहे. बेरोजगारी, गरिबी, महागाई, कुपोषण आणि शिक्षणातील असमानता या समस्या समाजामध्ये असंतोष निर्माण करू शकतात. आर्थिक संधींचे केंद्रीकरण झाल्यास समाजातील विविध घटकांमध्ये दरी वाढते. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागांतील आर्थिक अंतर कमी करणे, लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे, कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करणे गरजेचे आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, असंघटित क्षेत्रातील कामगारांची सुरक्षितता, स्थलांतरित मजुरांचे प्रश्न आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे सक्षमीकरण यांना राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला राष्ट्राच्या प्रगतीमध्ये योगदान देण्याची संधी मिळाल्यास नागरिकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते. विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविणे हेच राष्ट्रीय एकात्मतेचे व्यावहारिक स्वरूप आहे.

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये कला, साहित्य, संगीत, क्रीडा आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. भारतातील लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, नाट्यपरंपरा आणि साहित्य यांमधून विविध समाजघटकांच्या जीवनाचे दर्शन घडते. महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, भारूड आणि आदिवासी नृत्यपरंपरा जशा सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत, तसेच देशातील इतर प्रदेशांतील कला आणि परंपराही राष्ट्रीय संस्कृतीला समृद्ध करतात. साहित्यिक आणि सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धा, युवक महोत्सव आणि आंतरराज्यीय सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून विविधतेतील एकतेचा अनुभव घेता येतो. क्रीडा क्षेत्रामध्ये भाषिक, धार्मिक आणि प्रादेशिक भेद बाजूला ठेवून खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय संघाच्या विजयात प्रत्येक नागरिकाला आनंद होतो, कारण त्या क्षणी वैयक्तिक आणि प्रादेशिक ओळखींपेक्षा राष्ट्रीय ओळख अधिक महत्त्वाची ठरते. अशा अनुभवांमुळे सामूहिक अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्येही राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये खोलवर रुजलेली आहेत. संतपरंपरेने समता, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यातून समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित झाले. महाराष्ट्रातील विविध जाती, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक समूहांनी एकत्रितपणे सामाजिक जीवन समृद्ध केले आहे. राज्याच्या ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत विविध प्रदेशांतील लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने एकत्र राहतात. या सहअस्तित्वाला परस्पर आदर, सामाजिक सहकार्य आणि समान संधींची जोड मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची परंपरा राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यापक ध्येयाला प्रेरणा देणारी आहे.

राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना पर्यावरण संवर्धन आणि सामूहिक जबाबदारी यांचाही विचार करणे आवश्यक आहे. जलसंकट, हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण आणि नैसर्गिक आपत्ती या समस्या कोणत्याही एका जातीच्या, धर्माच्या किंवा प्रदेशाच्या मर्यादेत राहिलेल्या नाहीत. त्यांचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी सर्व नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाणी बचत, वृक्षारोपण, जैवविविधतेचे संरक्षण, स्वच्छता आणि शाश्वत विकास यांसारख्या उपक्रमांमध्ये सामूहिक सहभाग वाढविला पाहिजे. निसर्गाने निर्माण केलेल्या साधनसंपत्तीचा वापर जबाबदारीने करणे ही वर्तमान पिढीची भावी पिढ्यांप्रती असलेली नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणीय प्रश्नांवर एकत्रित कृती करण्याची भावना राष्ट्रीय एकात्मतेला अधिक व्यापक सामाजिक संदर्भ प्राप्त करून देते. राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या निमित्ताने केवळ कार्यक्रमांचे आयोजन करून किंवा एकात्मतेच्या घोषणा देऊन आपली जबाबदारी संपत नाही. राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये दैनंदिन जीवनात रुजविणे अधिक महत्त्वाचे आहे. कुटुंबामध्ये मुलांना जातीय आणि धार्मिक भेदभावापासून दूर राहण्याची शिकवण देणे, शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देणे, सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या अधिकारांचा आदर करणे आणि सामाजिक प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार करणे या कृतींमधून एकात्मतेचा पाया मजबूत होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध समाजघटकांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. नैसर्गिक आ

पोलीस गणवेशात घरात घुसून मारहाण केल्याचा महिला फौजदारांवर आरोप

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या दोन सहाय्यक महिला फौजदारांविरोधात घरात घुसून मारहाण, शिवीगाळ आणि मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

यातील एका महिला फौजदाराने पोलीस गणवेशात असतानाच मारहाण केल्याचा आरोप करण्यात आल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

सविता राजेंद्र आंधारे (वय ५५, रा. कुंभारखानी, मोहोळ) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यावरून कविता छबू घाडगे आणि जया छबू घाडगे ऊर्फ मुस्कान म. इसाक मुजावर या दोघींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जबाबावरून वाद; घरात घुसून मारहाण

फिर्यादीनुसार, १६ नोव्हेंबर रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास सविता आंधारे, त्यांचे पती राजेंद्र



आणि मुलगा पंढरीनाथ हे घरी असताना दोन्ही महिला त्यांच्या घरासमोर आल्या. खाजा मुजावर यांच्या बाजूने जबाब का दिला, असा जाब विचारत त्यांनी शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर घराच्या दरवाजाला लाथा मारून घरात प्रवेश केल्याचा आरोप आहे.

यावेळी कविता घाडगे या पोलीस गणवेशात होत्या. त्यांनी फिर्यादी आणि त्यांच्या पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच हातातील दगडाने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या मनगटावर मारल्याने जखम होऊन रक्तस्राव झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.

कारचे नुकसान; पोलीस ठाण्यातही गोंधळ

मारहाणीनंतर घरातून बाहेर पडताना लोखंडी गेटला लाथा मारून नुकसान करण्यात आले. तसेच अंगणात उभ्या असलेल्या होंडा सिटी कारच्या दरवाजावर दगड मारून डेंट पाडल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या घटनेनंतर आंधारे कुटुंबीय तक्रार देण्यासाठी मोहोळ पोलीस ठाण्यात गेले. मात्र, तेथेही शिवीगाळ आणि धक्काबुक्की करून तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकारामुळे पोलीस ठाण्यात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित पोलिसांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

घरातील सीसीटीव्ही फुटेज असल्याचा दावा

घटनेच्या वेळी मुलगा पंढरीनाथ याने डायल ११२ वर संपर्क साधल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये संपूर्ण प्रकार चित्रित झाल्याचा दावा फियार्दीने केला आहे. दरम्यान, पोलीस दलात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांविरोधातच गुन्हा दाखल झाल्याने या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. पोलीस गणवेशात मारहाण केल्याचा आरोप गंभीर असल्याने सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य पुराव्यांच्या आधारे तपासात नेमकी वस्तुस्थिती काय समोर येते, याकडे लक्ष लागले आहे.

या प्रकरणाचा तपास हेड कॉन्स्टेबल नितीन हरिचंद्र चावरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

अक्कलकोटमध्ये पेढा-मिठाई विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाचा छापा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांना विकल्या जाणाऱ्या पेढा आणि मिठाईच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने पेढा उत्पादक आणि मिठाई विक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाई करत तब्बल ८५० किलो मिठाईचा साठा जप्त केला.

जप्त केलेल्या साठ्याची किंमत २ लाख ५० हजार २० रुपये आहे. या कारवाईमुळे अक्कलकोटमधील मिठाई विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या सोलापूर झोन-१ पथकाने अक्कलकोट येथील मुख्य मिठाई पुरवठादार मे. रंगोली स्वीट मार्ट (मालक समीर बडेसाहब मकानदार) यांच्या आस्थापनेची तपासणी केली. यावेळी अस्वच्छ परिस्थितीत मिठाईची साठवणूक, लेबलविषयक नियमांचे उल्लंघन आणि अन्न सुरक्षा नियमांमधील त्रुटी आढळल्या. तसेच मिठाईचा दर्जा निर्धारित निकषांनुसार नसल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

या कारवाईत ३९८ किलो कंदी पेढा आणि ४३१ किलो स्वीट हलवा असा एकूण ८२९ किलो मिठाईचा साठा जप्त करण्यात आला.

या पदार्थांचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, संबंधित मुख्य पुरवठादाराचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे.

मंदिर परिसरातील १२ दुकानांची तपासणी

१३ नोव्हेंबर रोजी श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरातील पेढा आणि प्रसाद विक्री करणाऱ्या १२ दुकानांची तपासणी करण्यात आली. यावेळी चार अनौपचारिक नमुने घेण्यात आले. तसेच २१ किलो स्वीट हलवा, अंदाजे ७ हजार ३५० रुपये किमतीचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला.

यामध्ये सलीम मकानदार पेढा स्टॉल येथून ३ किलो, तर रंगोली स्वीट मार्ट येथून १८ किलो स्वीट हलवा जप्त करण्यात आला. याशिवाय लेमन पेढा आणि स्वीट हलव्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले.

चार दुकानांना व्यवसाय बंदचे आदेश

तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींमुळे समर्थ स्वीट स्टॉल, पाटील स्वीट शॉप, रंगोली स्वीट मार्ट (मंदिर परिसर) आणि सलीम मकानदार पेढा स्टॉल या चार आस्थापनांना व्यवसाय बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच पिरजादे प्लॉट येथील मुख्य रंगोली स्वीट मार्टचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला असून, गुरुकृपा पूजा भंडार या आस्थापनेची नोंदणीही निलंबित करण्यात आली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई सहआयुक्त (अन्न) श्रीकांत आर. करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त एस. ई. देसाई, अन्न सुरक्षा अधिकारी एखंडे आणि हिरेमठ यांच्या पथकाने केली.

अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी प्रशासनाकडून तपासणी मोहीम सुरू ठेवण्यात येणार आहे. नागरिकांनीही पेढा आणि मिठाई खरेदी करताना गुणवत्ता, उत्पादनाची तारीख आणि पॅकिंगवरील माहिती तपासावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

राकेश गायकवाड यांच्या 'ग्रंथविश्व' ला राज्य शासनाचा उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार!

मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):- नव्या पिढीमध्ये वाचनाची आवड निर्माण करून वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी गेल्या २१ वर्षांपासून अविरतपणे कार्यरत असलेल्या मंगळवेढ्यातील प्राथमिक शिक्षक राकेश औदुंबर गायकवाड यांच्या 'ग्रंथविश्व' ग्रंथालयाला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार जाहीर झाला आहे. राज्याच्या शहरी विभागातून द्वितीय क्रमांक मिळवत या ग्रंथालयाने ७५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले आहे. या पुरस्कारामुळे मंगळवेढ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, गायकवाड यांच्या वाचन चळवळीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील जनतेचे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यासाठी तसेच वाचन संस्कृतीचा प्रसार आणि विकास व्हावा, या उद्देशाने दरवर्षी उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार प्रदान केले जातात. यंदा या पुरस्कारासाठी राकेश गायकवाड यांच्या 'ग्रंथविश्व' ग्रंथालयाची निवड करण्यात आली आहे.

आपल्या आप्तस्वकीयांच्या स्मृती चिरंतन जपण्याच्या भावनेतून राकेश गायकवाड यांनी सन २००२ मध्ये 'ग्रंथविश्व' ग्रंथालयाची सुरुवात केली. सुरुवातीपासूनच वाचन संस्कृती रुजविणे आणि नव्या पिढीला पुस्तकांशी जोडणे हे ध्येय त्यांनी डोळ्यासमोर ठेवले. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी ही वाचन चळवळ सातत्याने सुरू ठेवली आहे.

'ग्रंथविश्व'मध्ये सुमारे १६ हजार पुस्तकांचा अनमोल खजिना उपलब्ध आहे.

याशिवाय वाचकांसाठी दररोजची वृत्तपत्रे, विविध विषयांवरील मासिके आणि नियतकालिके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे बालवाचकांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी स्वतंत्र बालवाचन दालनही उभारण्यात आले आहे.

केवळ पुस्तकांचा संग्रह न करता वाचनाची आवड जोपासणारे आणि ज्ञानाची नवी दालने खुली करणारे ग्रंथालय म्हणून ह्यग्रंथविश्वह्णने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. राकेश गायकवाड यांनी जिद्द, सातत्य आणि सामाजिक बांधिलकीतून उभी केलेली ही वाचन चळवळ आता राज्यस्तरावर गौरवली गेली आहे.

या पुरस्कारामुळे मंगळवेढ्यातील साहित्यप्रेमी, वाचक आणि शिक्षण क्षेत्रातून आनंद व्यक्त होत असून, राकेश गायकवाड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना (महाराष्ट्र राज्य) व क्रांतिवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळ, कबड्डी संघ, लष्कर, सोलापूर यांच्या वतीने तसेच लायन्स मधुरबाई फतेहचंद दमाणी हॉस्पिटल, लायन्स ब्रिमजोन फोफळिया नेत्रालय (धर्मार्थ दवाखाना) आणि जिल्हा अंधत्व निवारण समिती, दमाणीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले होते. हे शिबिर समाजसेवक कैलासवासी सिद्राम रामा पाटोळे व लायन्स कैलासवासी दिनेश बिराजदार यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आले होते

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक वाचनालय, उत्तर सदर बाजार, महावीर चौक, भाजी मंडईजवळ, लष्कर, सोलापूर येथे आयोजित या शिबिराचे उद्घाघाट्न लायन्स क्लब चे प्रांतपाल लायन राजेंद्र शहा कासवा साहेब यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरात गरजू 89नागरिकांची मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. तसेच मोतीबिंदू निदान झालेल्या 18 रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. 18 रुग्णांचे मोफत मोतीबिंदूचे शस्त्रक्रिया ब्रिजमोहन फोकलिया नेत्रालय दमानी नगर येथे होणार आहे

यावेळी लष्कर मातंग समाजाचे अध्यक्ष भिमराव दाजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संयोजक क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश (आप्पा) पाटोळे, प्रमुख पाहुणे क्रांतिवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळाचे अध्यक्ष सनी जरापटके,आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच लायन्स नेत्रालय, सोलापूरचे ऑप्थॅल्मोलॉजिस्ट श्रीमती सुवर्णा काळे , महासिद्ध माम्हणे,लायन्स क्लब ऑफ सोलापूर चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव लायन विकास पाटील, कोषाध्यक्ष लायन धनराज कोरे-पाटील व डॉ. शिवाजी पाटील यांचे सहकार्य लाभले.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामुळे गरजू नागरिकांना नेत्रतपासणी व मोतीबिंदू उपचाराची सुविधा उपलब्ध झाली. अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे समाजातील सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. असे प्रतिपादन उद्घाटक प्रांतपाल राजेंद्र शहा कासवा यांनी केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश पाटोळे यांनी केले आभार प्रदर्शन ओंकार पाटोळे यांनी केले.

नातेपुते नगरपंचायत, नातेपुते

ता. माळशिरस, जि. सोलापूर

आज़ादी का अमृत महोत्सव

2021-22 Majhi Vasundhara2

दुरध्वनी क्रमांक : ०२१८५-२६२३३८ Email ID: nateputenp@gmail.com

जा.क्र.ना.न.पं./१११५/२०२६ दिनांक १८/११/२०२६

जाहीर नोटीस

(महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी १९६५ चे कलम ११४ व ११९ अन्वये)

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी, अधिनियम १९६५ चे कलम ११४ नुसार नातेपुते नगर पंचायत क्षेत्रातील एकूण ५ प्रभागाचे कर निर्धारण करण्यात आलेल्या करमुल्यांकनाच्या याद्यांची प्राथमिक प्रसिद्धी दि. १५/०६/२०२६ रोजी करण्यात आले आहे. सदर करमुल्यांकन याद्या नागरिकांना तपासणीकरिता व आक्षेप अर्ज नोंदविणेकरिता नातेपुते नगरपंचायत कर विभागात कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता दि. १५/०६/२०२६ ते दि. १५/०७/२०२६ या कालावधीत उपलब्ध करून देणेत आलेबाबत यापूर्वी दि. १३/०६/२०२६ रोजीच्या पुण्यनगरीच्या अंकात प्रसिद्ध करणेत आले आहे. नागरिकांच्या सोयीसाठी सदर कालावधीत वाढ करुन नमुद करमुल्यांकन याद्या नागरिकांना तपासणीकरिता व आक्षेप अर्ज नोंदविणेकरिता दि. ३०/०७/२०२६ पर्यंत मुदतवाढ देणेत आलेली होती. तथापि प्रशासकीय कारणास्तव कर आकाराणी प्रक्रीयेत विलंब झालेने करमुल्यांकन याद्या नागरिकांना तपासणीकरिता व आक्षेप अर्ज नोंदविणेकरिता दि. ०७/१२/२०२६ पर्यंत मुदतवाढ देणेत येत असुन दि. ०७/१२/२०२६ पर्यंत सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० या कार्यालयीन वेळेत आक्षेप अर्ज स्वीकारले जातील. मुदतीनंतर आलेले आक्षेप अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, तसेच आक्षेप अर्ज नसलेल्या व मुदतीनंतर आक्षेप अर्ज सादर केलेल्या मालमत्ताधारकांना करनिर्धारण मान्य आहे, समजण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
मुख्याधिकारी
नातेपुते नगरपंचायत, नातेपुते

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
सिक्युरिटी गार्ड
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू




जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) छ. शिवरायांवर आधारित रणजित देसाई लिखित कादंबरी २) कलर (मराठीत) ३) प्राथमिक शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी संस्था ४) फळातील गोड द्रव ५) एक औषधी लाल रंगाचे कंदमूळ ६) बोलावण्यासाठीची आरोळी ७) धावपट्टू (इंग्रजीत) ८) भाजप नेते रावसाहेब दानवे या जिल्ह्यातील आहेत ११) पडीक जमीन १२) ग्राम, खेडे १३) लोक, रयत १५) श्रीगणेशाचे एक नाव १७) गुणाकारच्या विरूध्दार्थी शब्द १८) वत उलट लिहा २०) स्वभावाने रागीट २२) विषमच्या विरूध्दार्थी शब्द २४) रक्तवाहिनी २६) शिर्डी येथील प्रसिध्द देवस्थान २७) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** २९) डांबरी रोड ३०) भारतीय फिरकी गोलंदाज-युजवेंद्र *** ३२) उत्सवाचा दिवस ३४) धांदल, गडबड ३५) कर्ज (इंग्रजीत) ३६) भाजप नेत्या-उमा *** ३८) शर्ट ३९) ब्रेड (मराठीत) ४१) मध्य मुंबईतील एक रेल्वे स्टेशन, जिना ४२) अफूप्रमाणे एक अंमली पदार्थ ४३) झाडाचे पर्ण ४४) जय-पराजय, हार-** ४५) प्रख्यात स्व. गायिका-** मंगेशकर ४७) याच्यापासून शिरा बनवितात

आडवे शब्द : १) मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार ५) युवा नेता कन्हैय्याकुमार या राज्यातील आहेत ९) शोध, तपास १०) सल उलट लिहा ११) लगेच, लवकर १२) फळातील मुख्य गर १३) एक म्हण-नाकापेक्षा मोती ** १४) एक अभिनेत्री-*** टंडन १६) देवतांनी दिलेला आशिर्वाद १७) शिजवलेला तांदूळ १९) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेशपर ग्रंथ-भगवत ** २१) आ. सुमनताई पाटील यांचा सांगली जिल्ह्यात असलेला मतदारसंघ २३) नय उलट लिहा २५) ओंजळ २८) याचे कणीस भाजून खातात २९) सत्वयुक्त, पौष्टीक ३०) बसण्यासाठी ही अंथरतात ३१) सक उलट लिहा ३३) लहानपण ३५) संसदेचे एक सभागृह ३७) बगिचा ३८) घर, निवास ४०) इराकची राजधानी ४२) गव्हाच्या पिठापासून बनवितात ती गोल *** ४४) प्राणप्रिय मित्र, जवळचे नाते ४६) दोघांमध्ये पडलेले अंतर, भेग (हिंदीत) ४८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ४९) एक हिंदी चित्रपट-** मचाये शोर, चोऱ्या करणारा ५०) वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार ५१) उन्हाळ्यातील एक महिना

सुडोकु - 102

	9	3	4	2	7	5		
		7		1	5	3		
	2	4	6	8				7
3			7	6		2	1	9
6								
			1	3				
4		5	8			9	2	6
		1	2		6		7	3
	7				9	8		

१९८ गावांना २२९ टँकरने पाणीपुरवठा करा !

रयत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांची मागणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त): सोलापूर जिल्ह्यात पाणीटंचाई आणि चारा टंचाईने गंभीर स्वरूप धारण केले असून, ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी आणि जनावरांच्या चाऱ्यासाठी शेतकऱ्यांची मोठी परवड होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत रयत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी सरकार आणि प्रशासनाला धारेवर धरत जिल्ह्यातील १९८ टंचाईग्रस्त गावांना २२९ टँकरद्वारे तातडीने आणि नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याचे आव्हान दिले आहे.



जिल्ह्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अनेक वाड्या-वस्त्यांवर नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही बिकट बनला आहे. त्यामुळे टंचाईग्रस्त भागात तातडीने चारा छावण्या सुरू करण्याची मागणी पवार यांनी केली आहे.

केवळ कागदोपत्री टँकरची संख्या दाखवून टंचाई निवारण होणार नाही. १९८ गावांपर्यंत २२९ टँकर प्रत्यक्षात पोहोचले पाहिजेत आणि नागरिकांना नियमित पाणी मिळाले पाहिजे. तसेच चारा छावण्या सुरू करून पशुधन वाचविण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. टंचाईग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष मदत पॅकेज जाहीर करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

"शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. मात्र, त्याच्याच गावात पिण्यासाठी पाणी नाही आणि जनावरांना चारा नाही, ही परिस्थिती सरकारने गांभीर्याने घेतली पाहिजे. टँकरची संख्या कागदावर दाखवून चालणार नाही. १९८ गावांना २२९ टँकरद्वारे प्रत्यक्ष पाणीपुरवठा झाला पाहिजे.

सरकारने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर रयत शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल," असा इशारा नामदेव पवार यांनी दिला.

दरम्यान, पाणी आणि चारा टंचाईच्या प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास जिल्ह्यातील शेतकरी अधिक आक्रमक होतील. त्यामुळे शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका पवार यांनी मांडली आहे.

'कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

पंढरपुरात ५४ आस्थापनांची तपासणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर शहरात येणाऱ्या लाखो भाविकांना सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ मिळावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजी पर्यंत पंढरपूर शहरात धडक तपासणी मोहीम राबविली.

या मोहिमेत अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील हॉटेल्स, मिठाई दुकाने, फरसाण केंद्रे, खानावळी, प्रसाद विक्रेते अशा ५४ आस्थापनांची अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान विविध खाद्यपदार्थांचे २० नमुने ज्यामध्ये भगर, बटाटा चिवडा, राजगिरा लाडू, चिक्की, बेसन, प्रसादाचे अन्नपदार्थ इ. विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत.

०४ आस्थापनांचे नोंदणी परवाने निलंबित

कार्तिकी वारीच्या अनुषंगे ०४ आस्थापनांचे नोंदणी परवाने निलंबित करण्यात आलेले असून त्या पेढीचे नावे खालीलप्रमाणे आहेत.

१. मे. द पॉप्यूलर रेस्टॉरंट, स्वीट मार्ट, बेकरी अँण्ड कोल्ड्रींक्स, स्टेशन रोड, पंढरपूर, जि. सोलापूर

२. मे. बेंगलोर अय्यंगार बेकरी, शिवाजी चौक, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

३. मे. श्री महावीर प्युअर व्हेज, कोर्टी रोड, इसबावी, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

४. मे. स्वागत एंटरप्रायजेस, शॉपिंग सेंटर १, कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर, जि. सोलापूर

कार्तिकी यात्रा निमित्त अन्न सुरक्षा जनजागृती बैठक

कार्तिकी यात्राच्या निमित्ताने पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी, भाविक व यात्रेकरूंच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्नसुरक्षेबाबत आवश्यक खबरदारी घेण्यासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते तसेच विविध व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी व संबंधित घटकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीमध्ये उपवासासाठी वापरण्यात येणाऱ्या भगर व इतर उपवासाच्या खाद्यपदार्थांची सुरक्षितता, त्यांची योग्य साठवणूक, हाताळणी व स्वच्छ पद्धतीने तयार करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यात्रेदरम्यान अन्नातून विषबाधा होण्याच्या घटना टाळण्यासाठी स्वच्छ पिण्याचे पाणी वापरणे, शिळे अथवा दूषित अन्नपदार्थांची विक्री न करणे, खाद्यपदार्थ झाकून ठेवणे, अन्न तयार करणाऱ्या व्यक्तींनी वैयक्तिक स्वच्छता राखणे तसेच विक्री व साठवणूक परिसर स्वच्छ ठेवणे याबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच भगर व इतर उपवासाच्या पदार्थांची खरेदी करताना दर्जेदार व प्रमाणित स्रोतांकडूनच खरेदी करावी, उत्पादनाची मुदत, पॅकिंग व लेबलिंग तपासावे आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ व त्याअंतर्गत नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच सर्व घाऊक व किरकोळ विक्रेत्यांनी यात्रेदरम्यान भाविकांना सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.

वारी काळात विशेष दक्षता

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात देशभरातून लाखो वारकरी दाखल होत असतात. या काळात भेसळयुक्त, निकृष्ट दर्जाचे किंवा उघड्यावरील अन्नपदार्थांमुळे भाविकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने विशेष दक्षता घेतली आहे. अन्नपदार्थ साठवणूक, स्वच्छता, वापरले जाणारे तेल, रंग व इतर घटकांची गुणवत्ता याबाबत काटेकोर तपासणी करण्यात आली.

निकृष्ट आढळल्यास कारवाई

नमुन्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निकृष्ट दर्जाचे किंवा भेसळयुक्त अन्नपदार्थ आढळल्यास संबंधित आस्थापनांवर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच सर्व व्यावसायिकांनी स्वच्छता, गुणवत्ता व नियमांचे पालन करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी केले आहे.

तसेच कार्तिकी वारी २०२६ साठी प्रशासनाचे २० पथके कार्यरत आहेत. वारी कालावधीत अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा, असेही प्रशासनाकडून आवाहन करण्यात येत आहे.

कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून विविध ठिकाणांची पाहणी

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज वाखरी पालखी तळ, सरगम चौक, चंद्रभागा वाळवंट व भक्तीसागर परिसराची पाहणी करून संबंधित विभागांकडून तयारीचा आढावा घेतला. यात्रा कालावधीत भाविकांची गैरसोय होणार नाही, यासाठी स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

कार्तिकी शुद्ध एकादशी २१ नोव्हेंबर रोजी असून, यात्रा कालावधी १० ते २४ नोव्हेंबर असा आहे. या काळात राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने वारकरी व भाविक पंढरपुरात दाखल होतात. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळपाहणी करून व्यवस्थेची माहिती घेतली.

चंद्रभागा नदीपात्र व घाट परिसरात स्वच्छता कायम राखण्यासाठी अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी नियुक्त करावेत.



नदीकाठावरील काटेरी झाडे-झुडपे काढावीत, घाटांवरील माती हटवून घाट स्वच्छ धुऊन घ्यावेत. घाटांच्या कोपऱ्यांमध्ये साचलेला कचरा तातडीने हटवावा. नदीपात्रात वाहनांचा प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. वाळवंटात खाद्यपदार्थ व माळा विक्री करणाऱ्या व्यावसायिकांमुळे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्यासही त्यांनी सांगितले.

भक्तीसागर परिसरात दिंड्यांसोबत येणारे वारकरी व भाविक मोठ्या संख्येने वास्तव्यास असतात. त्यांच्या सोयीसाठी नदीपात्रात जाण्या-येण्यासाठी तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या घाटाचे मुरुमीकरण व सपाटीकरण तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

वाखरी पालखी तळावर कार्तिकी यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणात जनावरांचा बाजार भरतो. या ठिकाणी जनावरे व पशुपालकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या उपचारासाठी २४ तास पशुवैद्यकीय पथक कार्यरत ठेवावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

सरगम चौक येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे काम सुरू असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक उपाययोजना करून वाहतूक सुरळीत राहील, याची दक्षता घ्यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्षा प्रणिती भालके यांनी चंद्रभागा वाळवंटात महिलांसाठी चेंजिंग रूमची संख्या वाढविणे तसेच परिसरात वेळोवेळी जंतुनाशक फवारणी करण्याची सूचना केली.

या पाहणीवेळी नगराध्यक्षा प्रणिती भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी सीताराम डुबल, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी आदी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या 23 योजनांसाठी महाडीबीटी 2.0 प्रणालीवर अर्ज प्रक्रिया सुरू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- मत्स्यव्यावसायिकांचे जीवनमान उंचावणे, आर्थिक समृद्धी साधणे, रोजगार व उद्योजकतेला चालना देणे तसेच मत्स्यव्यवसायातून शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाच्या 23 योजनांसाठी महाडीबीटी 2.0 प्रणालीवर ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिकांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांनी केले आहे.

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दि. 28 ऑक्टोबर 2026 रोजी महाडीबीटी 2.0 प्रणालीवर अर्ज स्वीकारण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनांमध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसायासाठीच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांचा समावेश आहे. या माध्यमातून पात्र मत्स्यव्यावसायिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे.

योजनेंतर्गत उपलब्ध शासकीय डेटाबेसच्या आधारे लाभार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करण्यात येणार आहे. मंजूर होणारे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात ऑनलाइन जमा करण्यात येणार असून, संबंधित सेवांची प्रमाणपत्रेही ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

ऑनलाइन अर्जासाठी महाडीबीटी 2.0 संकेतस्थळाचा वापर करा सोलापूर जिल्ह्यातील सर्व मत्स्यकास्तकार, मच्छीमार, मत्स्यव्यावसायिक तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे पदाधिकारी व सभासद यांनी https://mahadbt2.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर आधार क्रमांकाच्या आधारे महाआयडी तयार करून संबंधित योजनांसाठी ऑनलाइन अर्ज करावेत.

अर्ज करताना किंवा महाआयडी तयार करताना काही अडचणी उद्भवल्यास सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. या कार्यालयात मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत 9423758824/ 9970562920 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल.

संपर्कासाठी कार्यालयाचा पत्ता :

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, सोलापूर - 413003. संपर्क अधिकारी : श्री. भि. श. पाटील, मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, सोलापूर.

ई-मेल : acfsolapur@gmail.com जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिकांनी महाडीबीटी 2.0 प्रणालीवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया पूर्ण करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (तांत्रिक), सोलापूर ज. मो. शेख यांनी प्रसिध्दी कळविले आहे.

सात महिन्यांचे बाळही जगू शकते !

जागतिक अकाली जन्मदिनानिमित्त परिसंवाद

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- अकाली जन्मलेल्या बाळांचे जगणे, त्यांची वाढ आणि भवितव्य याबाबत पालकांच्या मनात भीती व अनेक गैरसमज असतात. मात्र, आधुनिक वैद्यकीय उपचारपद्धती, नवजात शिशू अतिदक्षता विभाग (एनआयसीयू), आईचे दूध आणि कांगारू मदर केअरच्या मदतीने अकाली जन्मलेल्या बालकांनाही निरोगी आयुष्य जगता येते. सात महिन्यांत जन्मलेले बाळही योग्य उपचार व काळजीच्या जोरावर निरोगी होऊ शकते, असा दिलासादायक संदेश तज्ज्ञांनी दिला. जागतिक अकाली जन्मदिनानिमित्त रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत समितीच्या वतीने इंडियन सोसायटी फॉर प्रीनेटल अॅन्ड थेरपी (आयएसपीएटी), आईशक्ती प्रतिष्ठान आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या सहकार्याने रेल्वे लाइन्स येथील नवल मॅटर्निटी अॅन्ड नर्सिंग होममध्ये जनजागृतीपर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. जयेश पटेल आणि पारुल पटेल यांच्या हस्ते परिसंवादाचे उद्घाटन झाले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ



सोलापूर नॉर्थच्या अध्यक्षा आसावरी सराफ, डॉ. मंजूषा शहा, डॉ. शीतल अजळकर, डॉ. अंबर दीक्षित, डॉ. रझिया पठाण, डॉ. पूनम नागटिळक यांच्यासह विविध क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. डॉ. मिलिंद शहा यांनी अकाली प्रसूतीची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच गर्भावस्थेदरम्यान नियमित वैद्यकीय तपासणीचे महत्त्व स्पष्ट केले. गर्भधारणेच्या काळात योग्य काळजी घेऊन वेळोवेळी वैद्यकीय तपासणी केल्यास अकाली प्रसूतीचा धोका कमी करण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

बालरोगतज्ज्ञ डॉ. अतुल कुलकर्णी यांनी एनआयसीयूची कार्यपद्धती आणि त्याचे महत्त्व समजावून सांगितले. बाळाला एनआयसीयूमध्ये दाखल केले म्हणजे त्याची प्रकृती अत्यंत गंभीर आहे, असा समज चुकीचा आहे. अकाली जन्मलेल्या किंवा विशेष वैद्यकीय देखभालीची आवश्यकता असलेल्या बालकांना आवश्यक उपचार व निरीक्षण देण्यासाठी एनआयसीयू महत्त्वाची भूमिका बजावते, असे त्यांनी स्पष्ट केले.

अकाली जन्मलेल्या बालकांच्या पोषणासाठी आईचे दूध अत्यंत महत्त्वाचे असून, डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली कांगारू मदर केअर पद्धतीचा अवलंब केल्यास बाळाच्या आरोग्यविकासाला मोठी मदत होते, असे तज्ज्ञांनी सांगितले. परिसंवादादरम्यान उपचारानंतर पूर्णपणे निरोगी झालेल्या बालकांच्या पालकांनी आपले अनुभव उपस्थितांसमोर कथन केले. त्यांच्या अनुभवांमुळे अकाली जन्मलेल्या बाळांच्या पालकांच्या मनातील भीती आणि गैरसमज दूर होण्यास मदत झाली. यावेळी डॉ. राजश्री मेरू यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सृष्टी डांगरे यांनी केले.

अनगरच्या कै. शंकरराव बाजीराव पाटील विद्यालयात २८ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

अनगर (कटूसत्य वृत्त):- तब्बल २८ वर्षांनंतर एकाच वर्गात शिकलेले मित्र-मैत्रिणी पुन्हा एकदा शाळेच्या प्रांगणात एकत्र आले आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. बालपणीच्या आठवणी, शाळेतील गंमतीजमती, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्र-मैत्रिणींच्या सहवासातील अविस्मरणीय क्षणांना उजाळा देत कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अनगर येथे माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली. त्यानंतर सरस्वती माता आणि स्वर्गीय लोकनेते बाबुराव



(अण्णा) पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचे माजी विद्यार्थ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी श्री अनगरसिद्ध शिक्षण प्रसारक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत ढोले होते.

यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळेविषयीच्या भावना व्यक्त केल्या. तब्बल २८ वर्षांनंतर पुन्हा शाळेत येण्याचा आनंद, शिक्षकांचे लाभलेले मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील अविस्मरणीय प्रसंग कथन करताना अनेकजण भावूक झाले.

काळाच्या ओघात प्रत्येकजण वेगवेगळ्या क्षेत्रांत स्थिरावला असला, तरी शाळेने दिलेली मैत्री आणि संस्कारांची शिदोरी कायम असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

यावेळी विद्यार्थ्यांनी माजी प्राचार्यांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला.

या स्नेहमेळाव्यामुळे जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीचा आनंद द्विगुणित झाला.

शाळेच्या आठवणींनी पुन्हा एकदा सर्वांना विद्यार्थी जीवनात नेल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

याप्रसंगी प्राचार्य महादेव चोपडे, माजी मुख्याध्यापक विश्वजीत लटके दत्तात्रय गोडाळे उपप्राचार्य माधव खरात, पर्यवेक्षक राजेंद्र डोके, सेवानिवृत्त शिक्षिका शशिकला कोष्टी, सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक सीताराम बोराडे, पर्यवेक्षक चंद्रकांत यावलकर, संभाजी बोडके, रमेश चव्हाण, गोरख गायकवाड, सोमनाथ ढोले, बजरंग पाचपुंड, महादेव पवार यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यवान दाढे यांनी केले, तर माधव खरात यांनी आभार मानले.

महात्मा बसवेश्वर शासकीय आयटीआयचा पदवीदान समारंभ २१ नोव्हेंबरला

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), सोलापूर येथे उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांचा पदवीदान समारंभ शनिवार, २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संस्थेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

या समारंभास खासदार प्रणिती शिंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच उद्योजक तथा आयटीआय संस्था व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनंजय गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

समारंभात विविध व्यवसायांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेले सर्व प्रशिक्षणार्थी, त्यांचे पालक, माजी विद्यार्थी आणि स्थानिक उद्योजकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एम. एम. बिडकर व कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

कोट्यवधींचे सुशोभीकरण, तलावाची कचऱ्याने दुरवस्था !

सोलापूर (कटूसत्य वृत्त) - विजापूर रोड परिसरातील धर्मवीर संभाजी महाराज तलावात मोठ्या प्रमाणात केरकचरा टाकला जात असल्याने तलावाच्या सौंदर्याला गालबोट लागले आहे. तलावाच्या काठावर साचलेला कचरा आणि पाण्यावर पसरलेली जलपर्णी यामुळे परिसराचे विद्रुपीकरण होत असून, नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अलीकडेच या तलावाच्या सुशोभीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. त्यामुळे तलाव परिसराला आकर्षक स्वरूप प्राप्त झाले होते. मात्र, सध्या देखभालीअभावी आणि नागरिकांकडून होणाऱ्या कचरा टाकण्याच्या प्रकारांमुळे या सुशोभीकरणावर पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

तलावाच्या काठावर प्लास्टिकच्या पिशव्या, खाद्यपदार्थांचे अवशेष, विविध



प्रकारचा केरकचरा तसेच अन्य टाकाऊ वस्तूंचे ढीग साचले आहेत. पाण्यातही मोठ्या प्रमाणात कचरा तरंगताना दिसत असून, त्यातच जलपर्णीची मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने तलावाच्या पाण्याचा बराचसा भाग हिरवळीने व्यापला आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी याच तलाव परिसरात वैद्यकीय कचराही टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता.त्यामुळे तलावाच्या स्वच्छतेसह नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे.

एकीकडे तलावाच्या सुशोभीकरणासाठी लाखो-कोट्यवधी रुपये खर्च करायचे आणि दुसरीकडे त्याच परिसरात बिनदिक्कतपणे कचरा टाकून त्याचे विद्रुपीकरण करायचे, अशी विसंगत परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

तलावाचे सौंदर्य आणि स्वच्छता टिकवून ठेवण्याची जबाबदारी महापालिका प्रशासनाबरोबरच परिसरातील नागरिकांचीही आहे. मात्र, काही नागरिकांकडून तलाव परिसरात कचरा टाकण्याचे प्रकार सुरूच असल्याचे चित्र आहे.

कचरा टाकणाऱ्यांवर नियंत्रण मिळविण्यासाठी तलाव परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, कचरा टाकणाऱ्यांची ओळख पटवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, तसेच जलपर्णी व साचलेला कचरा तातडीने हटवावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

बार्शीत लहुजी वस्ताद साळवे जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर; ७५ जणांचे रक्तदान



बार्शी (कटूसत्य वृत्त):- आद्य क्रांतिगुरू क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या २३२ व्या जयंतीनिमित्त बार्शी येथे लहुजी ग्रुपच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७५ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक एकता, मानवता आणि सेवाभावाचा संदेश दिला. या शिबिरास बार्शी बाजार समितीचे संचालक सतीश उर्फ पप्पू हनुमंते, बप्पा कसबे, आनंद चांदणे, भास्कर बगाडे, नाथा मोहिते, योगेश लोंढे, अभी लोंढे, आशिष शिंदे, दास पवार, सुनील चव्हाण, रोहित अक्की अवघडे, दलित महासंघाचे निलेश खुडे, मिलिंद भालेराव, अभिषेक माने, कुणाल खंदारे, आनंद डोलारे, प्रमोद कांबळे, शेखर कसबे यांच्यासह पोलीस अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व लहुजी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. यावेळी विजय (नाना) राऊत यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

क्रांतिवीर लहुजी वस्ताद यांनी देशप्रेम, सामाजिक समता, बंधुभाव आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाचा विचार समाजाला दिला. त्यांच्या जयंतीनिमित्त रक्तदानासारखा समाजोपयोगी उपक्रम राबवून लहुजी ग्रुपने त्यांच्या विचारांना कृतीतून अभिवादन केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे व मान्यवरांचे आयोजकांनी आभार मानले.